**फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष भारत भेटीवर (17-19 फेब्रुवारी 2026)**

10 फेब्रुवारी 2026

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरुन फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष महामहिम इमॅन्युएल मॅक्रॉन हे 17-19 फेब्रुवारी 2026 दरम्यान औपचारिक भारत भेटीवर असतील.

2. या भेटीदरम्यान, उभय नेते हॉरिझॉन 2047 रोडमॅप मध्ये नमूद केलेल्या विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य बळकट करण्याबाबत चर्चा करतील. याव्यतिरिक्त, उभय नेते इंडो-पॅसिफिकमधील सहकार्यासह परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवर चर्चा करतील. उभय नेत्यांच्या संयुक्त उपस्थितीत मुंबईत भारत–फ्रान्स नवोपक्रम वर्षाचे संयुक्तपणे उद्घाटन पार पडेल. वर्ष 2026 दरम्यान सार्वत्रिकपणे दोन्ही देशांमध्ये साजरे केले जाईल. 19 फेब्रुवारी रोजी, राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन हे नवी दिल्लीमध्ये आयोजित AI इम्पॅक्ट समिटमध्ये देखील सहभागी होतील.

3. पंतप्रधान मोदी यांच्या फेब्रुवारी 2025 मधील फ्रान्स दौऱ्यानंतर ही भेट पार पडत आहे. भारत–फ्रान्स धोरणात्मक भागीदारीतील परस्पर विश्वास व दृढता तसेच ही भागीदारी अधिक बळकट करण्याची उभय देशांची सामायिक वचनबद्धता अधोरेखित करते.

**नवी दिल्ली**

10 फेब्रुवारी 2026